अपर पोलीस आयुक्त,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांचे कार्यालय, ९१
सर पोचखानवाला रोड, वरळी, मुंबई ४०० ०३०
दुरध्वनी क्र. २४९२१२१२, २४९२२६१८
E-mail addlcpacbmumbai@mahapolice,gov.in
दिनांक :- १९/०५/२०२६

**-: प्रेसनोट :-**

| | |
|---|---|
| ला.प्र.वि. | मुंबई विभाग |
| गु.र.क्र | १४/२०२६ |
| कलम | कलम ७ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ |
| आरोपी लोकसेवक | राहुल विठ्ठल शिंदे, वरिष्ठ लिपीक, विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालय, चर्नी रोड, मुंबई |
| लाचेची मागणी | रू. १,५०,०००/- |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | रू. १,५०,०००/- |
| थोडक्यात हकीगत | यातील तक्रारदार हे नोकरी करीत असलेल्या शिक्षण संकुल संस्थेच्या इयत्ता ११ व १२ च्या वर्गांना प्रथम मान्यता मिळण्याबाबतची फाईल क्लिअर करण्यासाठी विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालय, चर्नी रोड, मुंबई येथील लोकसेवक राहुल विठ्ठल शिंदे, वरिष्ठ लिपीक यांनी तक्रारदार यांचेकडे रू. १,५०,०००/- लाचेची मागणी केली. परंतू तक्रारदार यांना लोकसेवकाला लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी दिनांक १३/०४/२०२६ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वरळी, मुंबई येथे समक्ष हजर राहून तक्रार दिली.<br>प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक १३/०४/२०२६ रोजी पंचासमक्ष करण्यात आलेल्या पडताळणी दरम्यान लोकसेवक राहुल विठ्ठल शिंदे यांनी तक्रारदार यांच्याकडे ते नोकरी करीत असलेल्या शिक्षण संकुल संस्थेच्या इयत्ता ११ व १२ च्या वर्गांना प्रथम मान्यता मिळण्याबाबतची फाईल क्लिअर करण्यासाठी रू. १,५०,०००/- लाचेची मागणी करून लाच स्विकारण्याचे मान्य केल्याचे निष्पन्न झाले. त्यानुसार दिनांक १९/०५/२०२६ रोजी करण्यात आलेल्या सापळा कारवाई दरम्यान लोकसेवक राहुल विठ्ठल शिंदे यांना रू. १,५०,०००/- लाचेच्या रक्कमेसह रंगेहाथ पकडण्यात आले आहे. म्हणुन उपरोक्त नमूद लोकसेवक यांच्याविरूध्द भ्र.प्र.अधि. १९८८ चे कलम ७ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. |

**सापळा अधिकारी :- श्रीमती सुनिता दिघे, पोलीस निरीक्षक   पर्यवेक्षक अधिकारी:-   श्री. महेशजाधव, सहाय्यक पोलीस आयुक्त**

मार्गदर्शक अधिकारी:- श्री. संदिप दिवाण, अपर पोलीस आयुक्त, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई
श्री. राजेंद्र सांगळे, अपर पोलीस उप आयुक्त, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

१९/०५/२६
( अजित सुळे )
सहाय्यक पोलीस आयुक्त(प्रशासन),
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई बृहन्मुंबई विभागा तर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारसंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभागाशी संपर्क साधावा.

**संपर्क :- लाचलुचपत प्रतिबंधकविभाग, बृहन्मुंबई विभाग, ९१, सरपोचखानवाला मार्ग, वरळी, मुंबई.**

**टोलफ्री क्र. १०६४, दूरध्वनी क्र. ०२२-२४९२१२१२, फॅक्स क्र. ०२२-२४९२२६१८**

**व्हॉट्सअप क्र. :- 8828241064   मोबाईल ॲप :- www.acbmaharashtra.net**

**वेबसाईट :- acbmaharashtra.gov.in, acbwebmail@mahapolice.gov.in**

**ईमेल :- addlcpacbmumbai@mahapolice.gov.in**

**फेसबुक :- www.facebook.com - Maharashtra ACB**

Scanned with OKEN Scanner